GOI-UNDP-GEF PROJECT
SINDHUDURG

UNDP
Empowered lives.
Resilient nations.

# प्रकल्पाची पार्श्वभूमी



सिंधुदुर्ग सागरी किना-यावर विपुल जैवविविधतेचे आश्रयस्थान आहे. इथे ३६७ सागरी वनस्पती व वन्यजीव प्रजाती आढळून येतात. त्यामध्ये जागतीक स्तरावर महत्व असणा-या व्हेल शार्क, डॉल्फीन, कासव, सागरी प्रवाळ प्रजातींचा समावेश आहे.

आर्थिकदृष्ट्या विचार करता सिंधुदुर्ग हे मत्स्यउत्पादन केंद्र आणि उदयास येणारे पर्यटनक्षेत्र आहे. सिंधुदुर्ग किनारपट्टीतील सर्व उत्पादन क्षेत्रांकरिता जैवविविधता संरक्षण हा महत्वाचा घटक आहे. तथापी अशाश्वत मच्छिमारी, वाढणारे पर्यटन आणि इतर विविध घटकांकडून प्रदूषण यामुळे स्थानिक जैवविविधतेवर भविष्यात प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे.

जैवविविधता टिकून रहावी, मासेमारी शाश्वत रहावी आणि लोकांना जैवविविधता संवर्धन करताना अतिरिक्त उत्पन्नाची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने जी.ई.एफ. अनुदानीत विशेष प्रकल्प, महाराष्ट्र शासन, संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमव भारत सरकारच्या सहाय्याने राबवित आहे. भारतात ईस्ट गोदावरी (आंध्रप्रदेश) आणि सिंधुदुर्ग या दोनच ठिकाणी अशा प्रकारचे प्रकल्प राबविले जात आहेत. हे जागतीक स्तरावर जैवविविधतेचे महत्व अधोरेखित करते.

सत्यमेव जयते

gef